# भारतीय लोकशाहीची वाटचाल

**पूजा सरजेराव चौगले,** संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.

---

**१.१ सारांश :**

लोकशाही एक शासन व्यवस्था आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत सातत्याने भारतीय लोकशाहीचा विकास सातत्याने सुरु असून प्रामुख्याने भारतात ब्रिटीश वसाहतींसोबत नवा विचार, नवी मुल्ये, नवीन व्यवस्था या उदारमतवादी मुल्यांचा प्रभाव भारतीयांवर पडला. यातूनच आपण संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संविधानाची निर्मिती हि लोकशाहीचा पाया घालणारी घटना होती. सार्वत्रिक मतदानाचा अधिकार सर्व नागरिकांना दिला गेला जो अत्यंत प्रगत निर्णय होता. जमीन सुधारणा, पंचवार्षिक योजना आणि औद्योगिकीकरनाची धोरणे राबवली. लोकशाही मुल्यांचा पाया मजबूत करण्यासाठी निवडणूक आयोगाची स्थापना झाली. हरित क्रांती, १९९१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकीकरण यामुळे मोठे बदल झाले. आणीबाणीच्या काळात (१९७५) लोकशाही मुल्ये पायदळी तुडवली असता जनतेने पुढील निवडणुकीत तत्कालीन सरकारला सत्तेतून पायउतार केले व लोकशाही मुल्यांची जपणूक केली. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीचा प्रवास पाहिला तर भारतीय लोकशाही अधिक दृढ होत चाललेली आहे. “सर्वांना समान संधी, सर्वांना समान न्याय” या तत्त्वावर आधारित असलेली भारतीय लोकशाही, भारताचे भविष्य घडविण्यासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिली आहे.

**१.२ प्रास्ताविक :**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. भारताने १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्रता प्राप्त केल्यानंतर, देशाने एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य होण्याचा निर्धार केला. भारतीय लोकशाहीची वाटचाल ही अनेक ऐतिहासिक, सामाजिक, आणि राजकीय घटकांनी घडवलेली आहे. भारतीय लोकशाही समजून घेण्यासाठी संविधानातील तरतुदी व त्यांचा अंमल करणारी शासकीय यंत्रणा कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांनी भारतीय लोकशाही टिकवून ठेवलेली आहे. भारताबरोबर इतर शेजारील राष्ट्रांनी सुद्धा लोकशाही शासन पद्धतींचा स्वीकार केला परंतु कालांतराने तेथील लोकशाही व्यवस्था कोसळली व त्यांचे रूपांतरण लष्करी हुकुमशाहीत झाले पण ही लोकशाही चिरकाल टिकणारी आहे. आज भारतीय लोकशाही ही विविधतेत एकता, बहुपक्षीय राजकारण, आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित आहे.

**१.३ पारिभाषिक शब्द (key words):** भारतीय लोकशाही, संघराज्य, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ.

**१.४ उदिष्टे:**

१. लोकशाहीची संकल्पना समजून घेणे.
२. भारतीय लोकशाही व्यवस्था समजून घेणे.
३.भारतीय लोकशाहीचा इतिहास अभ्यासने.

**१.५ लोकशाही:**

हा मूळ ग्रीक डेमोक्रेट्स या शब्दांपासून आलेला आहे. डेमोस *dêmos* (लोक) आणि क्राटोस *krátos* (नियम) साठी आला आहे. अर्थात डेमॉक्रसी *democracy* ज्याचा शाब्दिक अर्थ लोकशाही आहे. म्हणजे "लोकांचे शासन" असा आहे, लोकशाही, व्यक्तींना सरकारच्या स्वरूपावर आणि कार्यांवर राजकीय नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देते. अर्थातच लोकशाही गणराज्य म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व नि:पक्षपाती निवडणुकांद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतीनिधीद्वारे चालणारे राज्य होय.

1. कार्ल पॉपर : लोकशाही म्हणजे, "थोडक्यात, लोकशाही हे लोकांचे शासन आहे आणि लोकांना राज्य करण्याचा अधिकार आहे"
2. अब्राहम लिंकन: “लोकांनी लोकांकरीता लोकांच्या कल्याणासाठी चालवण्यात आलेले शासन म्हणजे लोकशाही होय.”
3. लॉर्ड ब्राईस :लोकशाही म्हणजे असा शासन प्रकार की ज्यामधे सत्ता एका विशिष्ट व्यक्तीच्या हाती नसते तर संपूर्ण जनतेच्या हाती असते.

- **लोकशाहीचा उदय:**

सर्वप्रथम काही प्रमाणात प्राचीन ग्रीस नगरराज्यात अथेन्समध्ये लोकशाही राज्यपद्धतीची बीजे आढळतात. ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोमांनी प्रजासत्ताकाप्रमाणे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. सिनेट हि प्रतिष्ठेची व लोकनियुक्त

संसदसदृश सभा होती व काही प्रमाणात उमराव घराण्यातील कुलीन पुरुषांना मतदानाचा हक्क होता. प्रथम निवडून आलेला कौन्सिल प्रशासनाचा प्रमुख असे. प्राचीन ग्रीस व रोम प्रमाणे भारतातही काही प्रदेशात लोकशाही प्राथमिक स्वरुपात अस्तित्वात होती. वेदोत्तर काळापासून गुप्त काळापर्यंत राजाविरहित गणराज्य होते. हि गणराज्ये सध्याच्या बिहार , सिंधु नदीचे खोरे आणि वायव्य प्रांत या भागात होती. यात प्रदेशानुसार कामकाजाच्या पद्धती भिन्न होत्या. तेथे कोणताही सभासद प्रस्ताव मांडे व चर्चा होऊन उघड व गुप्त मतदान घेण्यात येई. लोकशाहीची जननी असलेल्या इंग्लंडमध्ये १५ जुन १२१५ ला म्याग्नाकार्टाला संमती मिळाली. यात आत्ताच्या मुलभूत हक्कांचा पाया आहे. आणि तिस इंग्रजी राज्यघटनेचे बायबल म्हणतात. बिल ऑफ राइट्स आणि ॲक्ट ऑफ सेटलमेंटमुळे (१७०१) संसदेच्या लोकशाहीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन कॅबिनेट पद्धती (मंत्रिमंडळ) अस्तित्वात आली व पक्ष पद्धतीचा पाया घातला गेला. अनियंत्रित राजेशाहीचे परिवर्तन मर्यादित राजेशाहीत झाले व संसदीय शासनपद्धती विकास पावली. एकोणिसाव्या शतकात मताधिकाराचा विस्तार होत गेला. राजकीय घटना व पक्ष उदयाला आले इंग्लंडच्या अधिपत्याखालील अमेरिकी वसाहतींनी सशस्त्र लढा (१७७५–८३) देऊन स्वातंत्र्य मिळविल्यानंतर मर्यादित शासन व निसर्गसिद्ध हक्कांची कल्पना आधारभूत मानणारे लिखित संविधान संमत करून (१७ सप्टेंबर १७८७) मानवी हक्क, समानता इ. लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार केला. पहिल्या महायुद्धात पाश्चात्य राजेशाही जाऊन लोकशाही राज्यपद्धती उदयास आली.

१.६ **भारतातील लोकशाहीचा उदय :**

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा नावलौकिक आहे. भारतीय लोकशाहीचा पाया सर्व प्रथम सिंधू संस्कृती, ऋग्वेद, महाजन कालखंड यात दिसतो. यात समृद्ध लोकशाहीचे पुरावे आहेत. लोकशाहीतील बीजे जसे कि सर्व लोकांचा सहभाग सर्वसमावेश असलेले शासन यातून भारताच्या लोकशाही परंपरेचा वारसा उलगडता येतो. महाभारत, बौद्ध धर्मातील गण, संघ पाणिनीची अष्ठाध्यायी यांच्यातून भारतीय लोकशाहीचा वारसा इतिहासात स्पष्ट दिसतो. भारतातील सर्वात प्राचीन संकृती म्हणजे सिंधू होय. या संस्कृतीमध्ये लोकशाही पद्धतीने कारभार चालत असे व तेथूनच लोकशाहीस अनुसरून राजकीय सत्ता निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु झाली. नगर मध्ये सर्व निर्णय सर्वानुमते होत असत म्हणजेच, त्यांना एक प्रकारे मतदानाचा प्राथमिक स्वरूपातील अधिकार होता. सर्वाना आपली मते मांडण्याचा अधिकार होता. स्त्री पुरुषांना समान मते असत. ग्राम पातळीवर काम करणारी संस्था म्हणजे पंचायती, हि ऋग्वेदात आढळून येते, त्याचबरोबर राजाची थेट निवड सभा समितीमार्फत, राज्याचा कर गोळा करण्याचा अधिकार अशी काही लोकशाही तत्त्वे प्राथमिक अवस्थेत अस्तित्त्वात होती. १६ महाजनपदे व १० गणराज्ये बुद्ध काळात अस्तित्त्वात होती. राजाची निवड थेट जनतेकडून होत असे. यावरून असे म्हणता येईल की आजच्या लोकशाहीचा विकास व तत्त्वे प्राथमिक स्वरुपात प्राचीन इतिहासात दिसून येतात.

आधुनिक इतिहासामध्ये ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात लोकशाहीचा विकास होऊ लागला. ब्रिटिशांनी भारतात हळुहळू ब्रिटिश राजवटीतील काही महत्त्वाच्या घटनांमध्ये भारतीय लोकशाहीच्या सुरुवातीचे बीज पेरले. १७७३ च्या कायद्याने बंगालचा गव्हर्नर हा गव्हर्नर जनरल झाला व त्यास सहाय्य करण्यासाठी ३ सदस्यीय कार्यकारिणी मंडल स्थापले. म्हणजेच सध्याच्या मंत्रिमंडळाची पायाभरणी या कायद्याने झालेली आपणास दिसून येते. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर ब्रिटिशांनी भारतीय प्रशासन सुधारण्यासाठी काही कायदे लागू केले. त्यात भारतीय परिषद कायदा १८९२ आणि भारतीय परिषद कायदा १९०९ हे महत्त्वाचे होते. या कायद्यामुळे भारतीय नागरिकांना आपला प्रतिनिधी निवडण्यासाठी स्थानिक सभा आणि राष्ट्रीय सभांमध्ये सहभाग घेण्याची संधी मिळाली. ब्रिटिशांनी भारतामध्ये संसदीय, न्यायिक, आणि प्रशासकीय यंत्रणेला महत्त्व दिले परंतु त्यांचा हेतू कायम भारतावर राज्य करण्याचा होता. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलनाची सुरूवात झाली. गांधीजींचे 'सत्याग्रह' आणि 'नम्रता'चे तत्त्व लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना समर्थन देणारे होते. स्वातंत्र्य संग्रामाच्या दरम्यान, काँग्रेसने भारताच्या लोकशाही मूल्यांचा प्रचार केला आणि त्यासाठी विविध चळवळी राबवल्या. याच चळवळीतून भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने स्थापन होण्यास सुरुवात झाली.

१) **भारतीय संविधानाची निर्मिती:** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या लोकशाहीची सुसंस्कारित आणि संघटीत प्रणाली तयार करण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती करणे आवश्यक होते. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली अप्रत्यक्षरीत्या निवडलेल्या संविधान सभेचे कामकाज सर्व समाज, राज्य, महिला, धर्म यांना योग्य प्रतिनिधीत्त्व देऊन सुरू झाले. घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती स्थापन करण्यात आली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकृत करण्यात आले आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते लागू झाले. संविधानाने भारताला एक सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापन केले.

२) **भारतीय लोकशाहीत राज्यघटनेची भूमिका :** भारतीय लोकशाही ही भारतीय परंपरा, संस्कृती ,वारसा, थोर विचार , जागतिक लोकशाही वारसा यांच्यातून अस्तित्त्वात आली. विशाल राष्ट्राच्या दृष्टीने भारताने संघराज्य शासनपद्धती, संसदीय शासन प्रणाली, सार्वभौमत्त्व, न्यायिक सर्वोच्चता, एकात्मिक न्यायव्यवस्था, सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धती, धर्मनिरपेक्ष राज्य यातून भारतातील सर्व नागरिकांना सामावून घेतले. नागरिकांना घटनेने मुलभूत अधिकार देऊन नागरिकांचे नैसर्गिक अधिकार अबाधित ठेवलेले आहेत. याची पायमल्ली शासन करू शकत नाही. याशिवाय राज्याच्या कल्याणकारी दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. संविधानात दिलेल्या मुलभूत अधिकारांनी नागरिकांना व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळवण्याची संधी दिली. भारतीय लोकशाहीमध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे निवडणूक प्रक्रिया. प्रत्येक पाच वर्षांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतल्या जातात. या निवडणुकांत जनतेला त्यांचा प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला जातो. लोकशाहीतील प्रमुख तत्त्व म्हणजे सार्वभौम, प्रतिनिधित्व, समानता, व्यक्ती स्वातंत्र्य आणि न्याय. १९५१ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना झाली, ज्याचे प्रमुख कार्य निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि निःपक्षपातीपणा राखणे आहे. अशाप्रकारे भारतीय लोकशाहीला अखंडपणे टिकवून ठेवण्याचे कार्य भारतीय राज्यघटना करते.

३) **भारतीय लोकशाहीचे स्तंभ :** कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ आणि प्रसारमाध्यमे.

I. **कायदेमंडळ:** ही देशाच्या राजकीय घटकासाठी लोकांच्यावतीने कायदे बनवण्याचा कायदेशीर अधिकार असलेली विचारपूर्वक सभा होय. राज्याच्या ध्येयधोरणांना कायदेशीर शक्ती प्रदान करणे हे प्रमुख कर्तव्य कायदेमंडळाचे आहे. भारताने द्विगृही कायदेमंडळाचा स्वीकार केला आहे. राज्यसभा (वरीष्ठ सभागृह) राज्याचे प्रतिनिधित्त्व करते. आणि लोकसभा (कनिष्ठ सभागृह ) लोकांचे प्रतिनिधित्त्व करते. येथे सर्व कारभार लोकशाही पद्धतीने लोककल्याणासाठी पार पाडला जातो. सर्व लोकप्रतिनिधींना मुक्तपणे आपल्या जनतेच्या समस्या मांडण्याचा अधिकार प्रदान केला जातो. कायदे पारित करणे, सरकारचे बजेट तयार करणे, कार्यकारी नियुक्तीची पुष्टी करणे, करारांना मान्यता देणे, कार्यकारी शाखेची चौकशी करणे, महाभियोग चालवणे आणि प्रशासन आणि न्यायपालिकेच्या सदस्यांना पदावरून काढून टाकणे आणि घटकांच्या तक्रारींचे निवारण करणे ही विधिमंडळाची काही कार्ये आहेत.

II. **कार्यकारी मंडळ:** यात राष्ट्रपती , पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. लोकसभेतील धोरणांची अंमलबजावणी आणि कायद्यांची कार्यवाही ही प्रमुख कार्ये पार पाडणारी यंत्रणा. कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी आणि सार्वजनिक धोरणनिर्मिती करणाऱ्या शासनाच्या अंगाला कार्यकारी मंडळ असे म्हणतात. राष्ट्रपती हे नामधारी प्रमुख तर पंतप्रधान वास्तविक प्रमुख असतात. संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळाच्या प्रमुखाची निवड कायदेमंडळातील लोकप्रतिनिधी गृहातील सदस्यांच्या इच्छेवर आधारित असते. कनिष्ठ सभागृहात बहुमत मिळालेल्या पक्षाच्या नेत्याची निवड कार्यकारी प्रमुख म्हणजेच पंतप्रधानपदी होत असते. सर्व महत्त्वाच्या प्रशासकीय, राजकीय आणि राजनयिक नियुक्त्या कार्यकारी मंडळाच्या इच्छेनुसार होतात. भारतातील राज्यपाल, निवडणूक आयुक्त, महालेखापरिक्षक, वित्त आयोगाचा प्रमुख, केंद्रीय सनदी सेवांचे सदस्य, विविध राष्ट्रीय आयोगांचे अध्यक्ष आणि सदस्य, विविध देशांतील राजदूत आदिंची नियुक्ती कार्यकारी मंडळ करते.

III. **न्यायमंडळ:** घटनेने भारतासाठी एकेरी न्याय व्यवस्थेची तरतूद केली आहे किंवा भारतातील न्यायव्यवस्था एकात्म स्वरुपाची आहे. या न्यायव्यवस्थेच्या सर्वात वरच्या पातळीवर भारताचे सर्वोच्च न्यायालय असून त्याखाली घटकराज्यांतील उच्च न्यायालये आहेत. तर उच्च न्यायालयांच्या नियंत्रणाखाली जिल्हा न्यायालये व त्यानंतर दुय्यम न्यायालये अशी रचना आहे. म्हणजेच, सर्वोच्च न्यायालय – उच्च न्यायालये – जिल्हा न्यायालये - दुय्यम न्यायालये अशा प्रकारची उतरंडींची रचना आहे. कार्य- कायदेमंडळाने केलेले कायदे राज्यघटनेस किंवा कायद्यास अनुसरून आहेत किंवा नाही हे तपासणे, राज्यघटनेची सर्वोच्चत्ता टिकविणे, कायद्यांचा अर्थ लावणे आणि लोकांमधील वाद मिटवणे, लोकांच्या मूलभूत अधिकारांची काळजी घेणे आणि त्यांचे संरक्षण करणे. लोकशाहीचा वॉचडॉग म्हणून ती यंत्रणा सरकारच्या योग्य कार्याची काळजी घेते. लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. न्यायमंडळ ही संस्था कार्यकारी आणि विधान संस्थांना सल्ला देखील प्रदान करते.

IV. **प्रसार माध्यमे:** लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्याची जबाबदारी मीडियाची असते. यात प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियाचा समावेश आहे. हे वॉचडॉग म्हणून काम करते आणि विधिमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायपालिका यांना जबाबदार धरते. हे नागरिकांचे भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य राखते आणि लोकांचा आवाज म्हणून कार्य करते. प्रसारमाध्यम म्हणजे बाकी तीन संस्था आणि सामान्य जनता यांच्यामधील तो एकमेव दुवा असतो.

संसदेत किंवा विधिमंडळात जे काही वेगवेगळे कायदे संमत केले जातात त्याची माहिती जनसामान्यांना देण्याचे काम ही माध्यमे करत असतात.

लोकशाहीचे हे चार स्तंभ लोकशाही समाजाच्या कार्यप्रणालीसाठी आणि टिकाऊपणासाठी महत्त्वपूर्ण आहेत .

**४ भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने:**

- **दहशतवाद**: हा साधारण धार्मिक संघर्षातून होणारा दहशतवाद असतो यांमुळे समाजामध्ये तेढ निर्माण होऊन समजतील स्थैर्य बिघडते आणि लोकशाहीने निर्माण केलेली राजकीय व्यवस्था अस्थिर होते. यामुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होऊन लोकशाहीतील सहभाग कमी होतो.
- **नक्षलवाद** : हा प्रामुख्याने आदिवासी, शेतकरी यांच्यावरील सरकार जमीनदार,सावकार यांच्याकडून होणाऱ्या अन्यायातून निर्माण झाला असून सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, हल्ले करणे, कत्तली करणे यांमुळे भारतीय अंतर्गत असुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.
- **लालफिताशाई**: भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होऊन दप्तरदिरंगाई होते. आर्थिक गैरव्यवहार यामुळे इतर व्यक्तींवर अन्याय होऊन लोकशाहीची पायमल्ली होते.
- **सदोष निवडणूक:** बनावट मतदान, मतदारांना लाच देणे, मतदारांना पळवून नेणे, निवड यंत्रात फेरफार करणे, दिवसेंदिवस निवडणुकांमध्ये होणारा पैशांचा गैरवापर या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो.
- **राजकारणाचे गुन्हेगारीकरण:** लोकप्रतिनिधींचे वाढते गुन्हेगारी प्रमाण २०२४-२५१ (४६%) लोकसभा. हेच प्रमाण २०१९-२३३ (४३%), २०१४-१८५ (३४%), २००९-१६२ (३०%), म्हणजेच २००९ च्या तुलनेत ५५% गुन्हेगारीची पार्श्वभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींची वाढ झालेली आहे. यामुळे लोकसार्हता कमी होत आहे. हा लोकशाहीसाठी खूप मोठा धोका आहे.

धार्मिक मूलतत्त्ववाद, जातीय वाद, लिंगभेद, गरिबी, प्रादेशिकतावाद, सामाजिक आव्हाने, भाषावाद, प्रांतवाद, समाजवाद, यांसारखी अनेक लोकशाही समोर आव्हाने उभी आहेत. परंतु या सर्व समस्यांचा सामना करत, भारतीय लोकशाहीने स्वतःला पुढे नेले आहे..

**१.७ निष्कर्ष**:

भारतीय लोकशाहीची सुरुवात एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक घटना होती. या प्रक्रियेत भारताने अनेक चढ-उतार, संघर्ष आणि जडणघडण अनुभवली. परंतु त्यानंतर भारतीय लोकशाहीने स्वतःला एक सशक्त, समावेशक आणि विविधतेच्या स्वीकारासाठी महत्त्वपूर्ण ठरले. आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे आणि याचे श्रेय संविधान, जनतेचा सक्रिय सहभाग, आणि विविध चळवळींच्या कार्यप्रणालीला आहे.

**१.८ संदर्भ सूची :**

१. कुरकुटे हनुमंत, खरात वसंत, देशमुख श्रीकांत, (२०२१), भारतीय लोकशाहीतील वाटचाल अथर्व पब्लिकेशन , पुणे.
२. भोळे भा.ल., (२०१४), 'भारताचे शासन व राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३. डॉ. कांबळे बाळ, (२०१०), 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, पुणे.
४. द. वायर मराठी, कुलकर्णी प्रसाद, (२१ मार्च २०२२), 'आव्हानांच्या विळख्यातील लोकशाही'.
५. डॉ. विघे प्रशांत व डॉ. तेलगोटे धर्मेंद्र, (२०१९), “लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन”, श्री. साई प्रकाशन, नागपूर.
६. कुलकर्णी प्रसाद, जानेवारी (२०२३), “प्रसार माध्यमे आणि पर्यायी माध्यमे आणि लोकशाही”, प्रबोधन प्रकाशन ज्योती, इंचलकरंजी.
७. पुढारी, दै. सकाळ (१ ऑगस्ट २०१८) “लोकशाही आणि निवडणूका”, वर्धापन दिन विशेष.